नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६३। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) गुरूवार २९/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर. फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# शेतकरी व कामगार कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्याने किसान सभेचा वाहन मार्च स्थगित

युवावार्ता (प्रतिनिधी)

शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, कामगार, महिला आणि कष्टकरी जनतेच्या मागण्यांसाठी २६ ऑक्टोबरपासून सुरू झालेला किसान सभेचा अकोले ते मुंबई वाहन लाँग मार्च शहापूर येथे स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लॉन्ग मार्च ने अकोले ते शहापूर अंतर पार केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही उपमुख्यमंत्री, पाच मंत्री, संबंधित खात्यांचे सचिव आणि किसान सभेच्या शिष्टमंडळाची सुमारे दोन तास मुंबईत सह्याद्री अतिथीगृहावर बैठक झाली. विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होऊन अनेक मागण्यांबाबत ठोस आश्वासने व सकारात्मक निर्णय मिळाले. मान्य मागण्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ४ नोव्हेंबर रोजी पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना छऊठऋच्या निकषांच्या पलीकडे जाऊन मदत देणे आणि नमो शेतकरी महासन्मान निधीचे थकीत दोन हप्ते वितरित करण्याचे ठोस आश्वासन सरकारने दिले.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ करण्याच्या मागणीवर कर्जमाफी उपसमितीशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पीक विमा योजनेतील रद्द केलेले ट्रिगर पुढील वर्षी पुन्हा लागू करण्याबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका मांडली.

वन जमीन, वरकस जमीन, गायरान जमीन, देवस्थान जमीन, घरांच्या तळजमिनी आणि वर्ग दोनच्या जमिनींच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. या प्रश्नांवर आवश्यक कायदे व शासन निर्णय करण्याबाबत सहमती दर्शवण्यात आली.

बाळ हिरड्याच्या सरकारी खरेदीसाठी किसान सभेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला अभ्यास गट स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले. आदिवासींना भंडारदरा धरणाचे पाणी देणे आणि इको सेन्सिटिव्ह झोन रद्द करणे या मागण्यांवरही चर्चा झाली. केवायसी अभावी लाभापासून वंचित राहिलेल्या ८१ लाख लाडक्या बहिणींना पुन्हा योजनेत समाविष्ट करावे आणि केवायसी प्रक्रिया सुरू ठेवावी, या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. ज्यांची केवायसी झाली असेल आणि तरीही त्यांना मानधन मिळत नसेल, त्यांना ते लगेच सुरू केले जाईल असे मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांची दरमहा एक हजार रुपयांची मान्य मानधनवाढ लागू करू व मानधनात आणखी वाढ करण्याचा सकारात्मक निर्णय घेऊ, बांधकाम कामगारांची मेडिक्लेम योजना पुन्हा सुरू करू, पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याबाबत निर्णय करू असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

पेसा मोबिलायझर कर्मचाऱ्यांचे वेतन बचत गटांमार्फत न देता थेट त्यांच्या खात्यांत जमा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. थकित मानधन तातडीने देण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. अर्धवेळ परिचर, आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी आणि ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली. निराधार, वृद्ध, विधवा आणि दिव्यांगांच्या मानधनात वाढ करून त्यांनाही लाडकी बहीण (पान ४ वर)

# शॉर्टसर्किटने २०० ते २५० एकर ऊसात आगीचे तांडव; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

युवावार्ता (प्रतिनिधी)

शेवगाव - शेतातील विद्युत रोहित्रात झालेल्या शॉर्टसर्किटमुळे उसाच्या शेताला लागलेल्या भीषण आगीने शेवगाव तालुक्यातील शहापूर (आव्हाने खुर्द) परिसरात अक्षरशः हाहाकार उडवला. या आगीत सुमारे २०० ते २५० एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला असून, २५ ते ३० शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. ऊस वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावणारे ४ ते ५ शेतकरी जखमी झाले. मंगळवारी (दि. २७) दुपारी तीन वाजता लागलेली आग रात्री उशिरापर्यंत धुमसत होती. या भीषण घटनेमुळे परिसरातील शेतकरी हवालदिल झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, शहापूर येथील म्हसोबा विद्युत रोहित्रामध्ये मंगळवारी दुपारी अचानक बिघाड होऊन शॉर्टसर्किट झाले. त्यातून खालील गवताने पेट घेतला आणि काही क्षणांतच आगीच्या ज्वाळा शेजारील उसाच्या शेतात पसरल्या. परिसरात उसाचे सलग क्षेत्र असल्याने आगीने वेगाने रौद्ररूप धारण केले. वाऱ्याचा वेग अधिक असल्यामुळे आगीचा भडका वाढत गेला आणि काही वेळातच हिरवीगार ऊसशेती आगीच्या विळख्यात सापडली. आकाशात उंच धुराचे लोट पसरले, तर शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराची मेहनत जळून खाक होऊ लागली.

आगीची माहिती मिळताच गावातील तसेच परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. आग पुढे पसरू नये, यासाठी शेतकऱ्यांनी १५ ते २० ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटावेटर चालवून जळणाऱ्या क्षेत्राभोवती प्रतिबंधक पट्टा तयार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता आणि वाऱ्याचा वेग यामुळे त्यांचे प्रयत्न (पान २)

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

# थोरात कारखान्याच्या वतीने अपघातात मृत सभासदांच्या वारसांना 2 लाख रुपयांची मदत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे सभासद, शेतकरी, ऊस उत्पादक व कामगार यांचे कायम हित जोपासले जात असून कारखान्याने सभासदांचा प्रत्येकी दोन लाख रुपयांचा विमा उतरवला आहे या अंतर्गत अपघातात मृत पावलेल्या ४ सभासदांच्या वारसांना दोन लाख रुपयांचा धनादेश राज्याचे मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते देण्यात आला आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीत आंबी खालसा येथील कै.सुखदेव नामदेव गाडेकर, राजापूर येथील माधव हासे, व वडगाव पान येथील मनाजी रेवजी थोरात यांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचा धनादेशाचे वितरण त्यांच्या वारसांना करण्यात आले यावेळी मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात कारखान्याची व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, नाना शहाजी दिघे यांच्यासह विविध ग्रामस्थ उपस्थित होते.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या (पान २)

# दुष्काळामुळे राज्यातील सहकारी संस्थाच्या निवडणूका स्थगित

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने मोठा निर्णय घेतला. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. सहकार विभागाने शासन आदेश देखील जारी केला आहे. राज्यातील ३०४ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सरकारने हा निर्णय घेतला आहे. मदतकार्यावर परिणाम होऊ नये म्हणून निवडणुका थांबवल्याचा सरकारने दावा केला.

सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयीन आदेश असलेल्या संस्था स्थगितीतून वगळल्या असल्याची माहिती देखील समोर आली आहे. ज्या संस्थांचा नामनिर्देशनाचा टप्पा २७ ऑक्टोबरपूर्वी सुरू झाला त्यांच्या निवडणुका सुरू राहणार असल्याची माहिती सहकार विभागाकडून देण्यात आली. सहकार कायद्याच्या कलम ७३ क नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात न झालेल्या निवडणुका सध्याच्या टप्प्यावरूनच थांबणार आहे.

आदेशामधून सहकारी गृहनिर्माण संस्था, मा. उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे स्पष्ट आदेश दिलेल्या संस्था, तसेच ज्या संस्थांच्या निवडणुकीतील अर्ज दाखल करण्याचा टप्पा २७ ऑक्टोबर २०२६ पूर्वीच सुरू झालेला आहे अशा संस्थांच्या (पान २)

हॉलमार्क प्रमाणित
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
*नियम व अटी लागू
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
राजपाल

सणासुदीत सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50%* पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
नियम व अटी लागू
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!

राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# नाथभक्ती गीतांमुळे अध्यात्माचा जागर - डॉ. जयश्रीताई थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्याला सहकार सततच्या विकासाबरोबर साहित्य कला आणि अध्यात्माची मोठी परंपरा आहे . वारकरी संप्रदायाची मानवतेची शिकवण पुढे नेणारे आपण सर्व पाईक असून नाथ भक्ती गीतांच्या माध्यमातून अध्यात्माचा मोठा जागर होत असल्याचे प्रतिपादन संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले असून अलख निरंजन व नात गीतांनी कोकणगाव परिसर दुमदुमून गेला.

कोकणगाव येथे नाथ शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने तुळजाई माता मंदिर परिसरात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक चंदन कांबळे ,नाथपंथीय गायक आकाश शिंदे व मनोज बेल्हेकर यांच्या विशेष भक्ती गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी व्यासपीठावर डॉ. जयश्रीताई थोरात, गौतम बाबा दिघे, शरद नाना थोरात ,खंडू सातपुते ,संतोष वायकर, सरपंच आशाताई जोंधळे, आयोजक कल्पेश चौधरी, चैतन्य जोंधळे, सुदर्शन पारधी, विवेक सोनवणे, गोकुळ जोंधळे आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रम सुरू होताच चंदन कांबळे यांनी आलेख निरंजन ही हाक देतात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. तर आकाश शिंदे यांनी गायलेल्या नाथ गीतांना युवकांनी भरभरून दाद दिली. मनोज बेलेकर यांनी गायलेले गीतेही दुसरा महिला व पुरुषांची मोठी उपस्थिती असलेल्या या कार्यक्रमात नाथ गीतांच्या गजराने परिसर भक्तीमय झाला होता.

यावेळी बोलताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे यांच्या माध्यमातून या परिसराच्या सुशोभीकरणा निधी मिळाला असून हे मंदिर अध्यात्माचे मोठे केंद्र ठरले आहे नातं प्रतिष्ठानने नात गीतांचा कार्यक्रम आयोजित करून अध्यात्माचा जागर केला आहे.

वारकरी संप्रदायाने मानवतेचा मंत्र दिला आहे. राज्यघटना समानता आणि मानवता हे सर्वांसाठी महत्त्वाचा असून युवकांनी जातीभेदाला महत्त्व न देता मानवतेचा विचार पुढे नेण्यासाठी काम केले पाहिजे. जातिपातीचे राजकारण हे सोपे राजकारण आहे मात्र सातत्याने विकास कामे करणे हे अवघड राजकारण आहे. आपण सर्वांनी संत परंपरेचा वारसा पुढे नेत त्यांची मानवतेची शिकवण अधिक जपूया असे त्या म्हणाल्या.

# 'अमृतवाहिनी अभियांत्रिकी' च्या शिरपेचात मानाचा तुरा

## 'बेस्ट इनोव्हेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टम' व 'बेस्ट ग्रीन कॅम्पस' पुरस्कार घोषित




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-संगमनेर (प्रतिनिधी): अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर या स्वायत्त महाविद्यालयाने शैक्षणिक, नवकल्पना आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन-महाराष्ट्र आणि गोवा विभागाच्या वतीने वर्ष २०२६ साठीच्या मानाच्या पुरस्कारांमध्ये अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाला दोन प्रमुख श्रेणींमध्ये विजेते घोषित करण्यात आले आहे.

महाविद्यालयाला आयएसटीई तर्फे 'बेस्ट इनोव्हेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टम अवॉर्ड-२०२६' आणि 'बेस्ट ग्रीन कॅम्पस' - २०२६' या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांनी दिली.

महाविद्यालयाला मिळालेल्या या दुहेरी बहुमानासाठी आयएसटीई समन्वयक डॉ. एम. ए. वाकचौरे यांच्या मुख्य समन्वयाखाली विशेष काम करण्यात आले. 'बेस्ट ग्रीन कॅम्पस' पुरस्कारासाठी: महाविद्यालयातील परिसर पर्यावरणपूरक ठेवणे, सौर ऊर्जा प्रकल्प, वृक्षारोपण आणि शाश्वत उपक्रमांचा प्रस्ताव तयार करण्यासाठी डॉ. एस. बी. कांडेकर, प्रा. ज्योती मालुंजकर यांनी विशेष परिश्रम घेतले. 'बेस्ट इनोव्हेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टम' पुरस्कारासाठी: महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या नवकल्पना, संशोधन आणि स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्यासाठी डॉ. डी. एस. बजाज यांनी प्रमुख योगदान देत काम पाहिले.

**संशोधन, नवकल्पना आणि हरित उपक्रमांची दखल:**

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उद्योजकतेसाठी दिलेले प्रोत्साहन, आधुनिक नवकल्पना आणि स्टार्टअपसाठी उभारलेली भक्कम परिसंस्था या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालयाला 'बेस्ट इनोव्हेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टम' पुरस्कार मिळाला आहे. तसेच, परिसर पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी राबवलेले सौर ऊर्जा प्रकल्प, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त अभियान व शाश्वत उपक्रमांची दखल घेत आयएसटीईतर्फे 'बेस्ट ग्रीन कॅम्पस' हा मानाचा पुरस्कार घोषित करण्यात आला. अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय हे नॅक कडून '-+' श्रेणी, एनबीए ५ वेळा मान्यता प्राप्त आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न असलेले अग्रगण्य स्वायत्त महाविद्यालय आहे. या दुहेरी राष्ट्रीय बहुमानाबद्दल संस्थेचे पदाधिकारी व मान्यवरांनी विशेष आनंद व्यक्त केला.

या यशाबद्दल अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष व माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त मा. शरयु देशमुख, प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. संगमनेर परिसरासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून अमृतवाहिनी महाविद्यालयावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी लावलेल्या या शैक्षणिक रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे. आयएसटीईकडून 'बेस्ट ग्रीन कॅम्पस' आणि 'बेस्ट स्टार्टअप इकोसिस्टम' हे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळणे आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. आम्ही विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना नवकल्पना, उद्योजकता आणि पर्यावरण संवर्धनाचे धडे देत आहोत. या यशाच्या पाठीशी प्राचार्य, प्राध्यापक आणि सर्व विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम आहेत. अमृतवाहिनी महाविद्यालय भविष्यातही असाच नवनवीन गौरव मिळवत राष्ट्रीय पातळीवर आपला दबदबा कायम ठेवेल.**

**मा. शरयू देशमुख, व्यवस्थापकीय विश्वस्त**

# महाराष्ट्रात पुन्हा अवकाळी पावसाचा इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात एकीकडे ऑक्टोबर हिटचा चटका जाणवत असताना दुसरीकडे पुन्हा पावसाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २८ ऑक्टोबर रोजी राज्यातील अनेक भागांत हलक्या ते मध्यम पावसाच्या सरी कोसळू शकतात. काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज असून विदर्भातील गडचिरोली जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांनाही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काही भागांत ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांत प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. मात्र, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. २९ ऑक्टोबर रोजी राज्यातील काही भागांत पावसाचा यलो अलर्ट देण्यात आल्याचे अंदाजात नमूद आहे.धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत हलक्या पावसाचा अंदाज आहे. काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पाऊस पडू शकतो. या भागांत वाऱ्यांचा वेग ताशी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत जाण्याची शक्यता आहे.पुणे शहर आणि घाटमाथ्याच्या परिसरात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण जाणवू शकते. दुसरीकडे कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. कोल्हापूर जिल्ह्यासाठी यलो अलर्ट देण्यात आला असून ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# नाशिकमध्ये धार्मिक-सांस्कृतिक सोहळ्यांची पर्वणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - भारतीय संस्कृतीचा समृद्ध वारसा, संतपरंपरा, अध्यात्म, लोककला आणि विविधतेतील एकात्मतेचे दर्शन घडविणाऱ्या भव्य सांस्कृतिक शोभायात्रेचे आयोजन शुक्रवार ३० ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथे करण्यात आले आहे. त्यानंतर शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी पवित्र रामतीर्थ येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भव्य धर्मध्वजारोहण सोहळा संपन्न होणार आहे.

श्री गंगा गोदावरी पंचकोटी पुरोहित संघ, नाशिक यांच्या वतीने या दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक धर्मध्वजारोहण सोहळ्यास भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी आणि पूज्यपाद जगद्गुरु श्रीमद् रामानंदचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीचे नियोजन आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने वैष्णव आखाड्यांचे प्रमुख श्रीमंत तसेच हजारो संत-महंत, धर्माचार्य, विविध धार्मिक व सांस्कृतिक संस्थांचे प्रतिनिधी, रामानंद संप्रदायाचे अनुयायी आणि देशभरातून भाविक दाखल होण्याची अपेक्षा आहे.शुक्रवारी, ३० ऑक्टोबर रोजी नाशिकमध्ये भव्य सांस्कृतिक शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत रामानंद संप्रदायासह विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांची कलापथके सहभागी होणार आहेत. भारतीय संस्कृतीचा समृद्ध वारसा, संतपरंपरा, अध्यात्म, विविध प्रांतांतील लोककला आणि विविधतेतील एकात्मतेचे दर्शन या माध्यमातून घडविण्यात येणार आहे.

शोभायात्रेचा प्रारंभ मोदी ग्राउंड, नाशिक येथून होणार असून, विविध मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर पवित्र रामकुंड येथे गंगा-गोदावरी आरतीने तिचा समारोप होणार आहे. या कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीतील परंपरा, सामाजिक समरसता आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे.

# विद्यार्थ्याला टोळक्याची मारहाण १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल!

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर : सत्यनिकेतन संस्थेच्या अँड. एम. एन. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ एका टोळक्याने मारहाण केल्याची घटना सोमवारी (ता. २६) घडली. याप्रकरणी राजूर पोलिस ठाण्यात १५ ते २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सागर हरी गुंडनर (वय २३, रा. घाटघर, ता. अकोले) हा महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. सोमवारी त्याची परीक्षा असल्याने सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास महाविद्यालयात आला. यावेळी सोहम बापू शेळके याच्याशी त्याचा वाद झाला. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पेपर संपल्यानंतर सागर महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आला. त्यावेळी सोहम शेळके याने बाहेरून सुनील होडा आणि अन्य १५ ते २० जणांना तेथे बोलावून घेतले. या टोळक्याने

सागर याला शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणी पुढील तपास राजूर पोलिस करत आहेत.

# डॉ. प्रवीण गुंजाळ यांना विक्रांत विद्यापीठाची पीएच.डी. पदवी



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत बांधकाम क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण संशोधन पर्यावरणपूरक आणि शाश्वत बांधकाम साहित्य विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण संशोधन करणारे डॉ. प्रवीण काशीनाथ गुंजाळ यांना विक्रांत विद्यापीठाकडून पीएच.डी. ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी बहाल करण्यात आली आहे. काचेची पावडर आणि झिओलाइट यांचा वापर करून 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' अर्थात शहरी उष्णता बेट परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने त्यांनी संशोधन केले. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे त्यांचे अभिनंदन होत आहे.

आजच्या वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणामुळे शहरांमध्ये सिमेंट-काँक्रीटच्या इमारती, डांबरी रस्ते आणि वाढती बांधकामे यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. परिणामी, शहरांमध्ये उष्णता साठून राहण्याचे प्रमाण वाढते आणि शहरांचे तापमान आसपासच्या ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक जाणवू शकते. या समस्येला 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' असे म्हटले जाते. वाढते तापमान, ऊर्जेचा वाढता वापर आणि पर्यावरणावरील दुष्परिणाम लक्षात घेता, या समस्येवर शाश्वत उपाय शोधणे काळाची गरज बनली आहे.

डॉ. गुंजाळ यांनी काचेच्या पावडरचा पुनर्वापर आणि झिओलाइटचा वापर करून पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य विकसित करण्याच्या विषयावर संशोधन केले. या संशोधनामागील प्रमुख उद्देश म्हणजे बांधकाम क्षेत्रात पर्यावरणस्नेही पर्यायांचा शोध घेणे आणि शहरी भागातील उष्णतेची समस्या कमी करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकणाऱ्या साहित्याच्या विकासाला चालना देणे हा आहे. टाकाऊ काचेचा योग्य वापर करून संसाधनांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीनेही अशा संशोधनाला महत्त्व प्राप्त होते. डॉ. गुंजाळ यांचे हे संशोधन भविष्यात शाश्वत बांधकाम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकते. पीएच.डी.पर्यंतचा शैक्षणिक प्रवास पूर्ण करताना त्यांना गुरुजन, संशोधन मार्गदर्शक, मित्रपरिवार आणि कुटुंबीयांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# राज्यस्तरीय 'आरोग्यदूत' पुरस्काराने डॉ. प्रकाश वाकचौरे यांचा सन्मान

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अकोले येथील कारखाना रोड, राधानगरी कॉलनी येथे असलेले अकोले हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय 'आरोग्यदूत २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृह, सावेडी रोड येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी श्री. प्रवीण महामुनी (साईलीला संगीतमय महानाट्य), अमोल शेवाळे, यादवराव पावसे (समाजसेवक) आणि संघटित चळवळीचे नेते बाबासाहेब पावसे यांच्यासह वैद्यकीय, सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



अकोले तालुक्यांतील ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी अकोले हॉस्पिटल आणि अकोले मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक व सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागात मोफत सर्वरोग निदान व उपचार संदर्भात मार्गदर्शन शिबिरे, रक्त तपासणी शिबिरे, रक्तदान उपक्रम, हृदयरोग तपासणी, मधुमेह व रक्तदाब तपासणी तसेच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्यविषयक उपक्रम आयोजित केले जातात. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठीही ते सातत्याने प्रयत्नशील असतात. आरोग्यासोबत शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी व वैद्यकीय सेवेसोबतच शैक्षणिक क्षेत्रातही डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या हेतूने शैक्षणिक साहित्य व पुस्तके भेट देणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनाचे उपक्रम ही राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे आणि त्यांच्या पत्नी रुपाली प्रकाश वाकचौरे सातत्याने प्रयत्न करतात. या सर्व उपक्रमांना अकोले हॉस्पिटलच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभते.

आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, या उद्देशाने डॉ. प्रकाश वाकचौरे आणि अकोले मेडिकल फाउंडेशनच्या वतीने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, बांधकाम कामगार योजना आणि मुख्यमंत्री सहायता निधी यांसारख्या योजनांबाबत नागरिकांना माहिती व मार्गदर्शन केले जाते.

गरजू रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार मिळावेत, शासकीय योजनांचा लाभ मिळावा आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी, हीच त्यांच्या कार्यामागील प्रमुख प्रेरणा आहे. वैद्यकीय सेवा, आरोग्यविषयक जनजागृती, रक्तदान, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेऊन डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे यांना राज्यस्तरीय 'आरोग्यदूत २०२६' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानामुळे अकोले तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संपादकीय...

### जागतिक इंटरनेट दिनानिमित्ताने

# इंटरनेट क्रांतीने बदलले मानवी जीवनाचे चित्र!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. एकेकाळी केवळ संगणक आणि तंत्रज्ञान क्षेत्रापुरते मर्यादित असलेले इंटरनेट आज प्रत्येकाच्या हातातील भ्रमणध्वनीपर्यंत पोहोचले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण अनेक कामांसाठी इंटरनेटचा वापर करतो. संवाद साधणे, माहिती मिळवणे, शिक्षण घेणे, ऑनलाइन खरेदी करणे, बँकेचे व्यवहार करणे आणि मनोरंजन करणे यांसारख्या अनेक गोष्टी इंटरनेटमुळे सहज शक्य झाल्या आहेत. एखाद्या दिवशी इंटरनेट बंद पडले किंवा भ्रमणध्वनीतील इंटरनेट सेवा संपली, तर अनेक कामांमध्ये अडथळे निर्माण होतात. यावरून आपल्या जीवनातील इंटरनेटचे महत्त्व लक्षात येते. २९ ऑक्टोबर १९६९ हा दिवस इंटरनेटच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी अमेरिकेत संगणकांचे जाळे जोडणाऱ्या 'अर्पानेट' या प्रणालीच्या माध्यमातून दोन संगणकांदरम्यान पहिला संदेश पाठवण्याचा प्रयत्न करण्यात आला. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या संशोधन प्रकल्पातून या प्रणालीची निर्मिती झाली होती. कॅलिफोर्निया विद्यापीठातील लॉस एंजेलिस येथील संशोधक चार्ली क्लाइन यांनी स्टॅनफोर्ड संशोधन संस्थेतील संगणकावर 'लॉगिन' हा शब्द पाठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रणालीमध्ये अडचण आल्याने सुरुवातीला केवळ 'एलओ' ही दोन अक्षरेच दुसऱ्या संगणकापर्यंत पोहोचली. हा छोटासा संदेश पुढे आधुनिक इंटरनेटच्या विकासातील ऐतिहासिक टप्पा ठरला. त्यानंतर संगणकांच्या जाळ्याचा विस्तार होत गेला आणि जगभरातील संगणक एकमेकांशी जोडले जाऊ लागले. गेल्या काही दशकांत इंटरनेटने जगाचे रूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. पूर्वी एखादा संदेश दुसऱ्या शहरात किंवा परदेशात पाठवण्यासाठी बराच वेळ लागत असे. आज भ्रमणध्वनीवरील संदेशसेवा, विद्युत टपाल आणि दृक्संवादाच्या माध्यमातून जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी काही क्षणांत संपर्क साधता येतो. इंटरनेटमुळे अंतराची बंधने कमी झाली असून संवाद अधिक जलद आणि सुलभ झाला आहे. परदेशात राहणाऱ्या कुटुंबीयांशी बोलणे, कार्यालयीन बैठका घेणे आणि महत्त्वाची कागदपत्रे पाठवणे सहज शक्य झाले आहे. शिक्षण क्षेत्रात इंटरनेटमुळे मोठी क्रांती झाली आहे. विद्यार्थ्यांना संगणकीय माध्यमातून व्याख्याने, डिजिटल पुस्तके, शैक्षणिक चित्रफिती आणि विविध अभ्याससाहित्य सहज उपलब्ध होते. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना घरबसल्या मार्गदर्शन मिळते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही विविध शैक्षणिक अभ्यासक्रम शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दूरस्थ शिक्षणामुळे ज्ञान मिळवण्याच्या पारंपरिक मर्यादा कमी झाल्या आहेत. मात्र, इंटरनेटवरील माहितीचा योग्य वापर करणे आणि विश्वासार्ह स्रोतांची निवड करणे आवश्यक आहे. आरोग्य क्षेत्रातही इंटरनेट उपयुक्त ठरत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून डॉक्टरांचा सल्ला घेणे, वैद्यकीय तपासणीचे अहवाल मिळवणे आणि आरोग्यविषयक माहिती जाणून घेणे सोपे झाले आहे. दुर्गम भागातील रुग्णांनाही तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधता येतो. यामुळे वेळेची बचत होते आणि वैद्यकीय सेवांची उपलब्धता वाढण्यास मदत होते. व्यापार आणि बँकिंग क्षेत्रात इंटरनेटमुळे मोठे बदल झाले आहेत. वस्तूंची ऑनलाइन खरेदी-विक्री, संगणकीय बँकिंग, भ्रमणध्वनीद्वारे पैशांचे व्यवहार, वीजबिल भरणे आणि रेल्वेचे तिकीट आरक्षित करणे यांसारखी कामे घरबसल्या करता येतात. उद्योजकांना आपली उत्पादने देशभरातील तसेच परदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतात. लघुउद्योजक आणि व्यावसायिकांसाठी इंटरनेटमुळे बाजारपेठेच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. घरून काम करण्याच्या संधी वाढल्याने रोजगाराच्या स्वरूपातही बदल झाला आहे. शेती क्षेत्रात इंटरनेटचे महत्त्व वाढले आहे. शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज, बाजारभाव, आधुनिक शेतीतंत्र आणि सरकारी योजनांची माहिती मिळते. योग्य माहितीच्या आधारे शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन आणि शेतीविषयक निर्णय घेण्यास मदत होते. पत्रकारिता, मनोरंजन, पर्यटन आणि संशोधन या क्षेत्रांमध्येही इंटरनेटने मोठे बदल घडवले आहेत. भारतात १५ ऑगस्ट १९९५ रोजी सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू झाली. त्यानंतर भ्रमणध्वनीवरील इंटरनेट आणि स्वस्त माहितीसेवांच्या विस्तारामुळे इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढला. आज संगणकीय माध्यमातून पैशांचे व्यवहार, शासकीय सेवा आणि विविध सरकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी इंटरनेटचा वापर केला जात आहे.

# पाणीटंचाई निवारणासाठी सीएसआर निधीतून मदतीचे आवाहन

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांचे कंपन्या, स्वयंसेवी व धार्मीक संस्था आणि दानशूर व्यक्तींना आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्ह्यातील काही भागांत पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या प्रयत्नांना पूरक मदत मिळावी, यासाठी कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी देणाऱ्या कंपन्या, सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, उद्योजक, फाउंडेशन, दानशूर व्यक्ती आणि इतर इच्छुक घटकांनी स्वेच्छेने सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.



जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविणे, टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे, नाला खोलीकरण व रुंदीकरण करणे, गाळ काढणे, शेततळी आणि पाणीसाठवण संरचना निर्माण करणे, तसेच विहीर पुनर्भरण व जलपुनर्भरण यांसारख्या कामांसाठी सहकार्याची आवश्यकता आहे. याशिवाय पशुधनासाठी पाणी व चारा उपलब्ध करून देणे, दुष्काळामुळे प्रभावित कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य पुरविणे आणि आरोग्यविषयक मदत उपलब्ध करून देणे, अशा विविध उपक्रमांसाठीही मदतीची अपेक्षा आहे.

गावपातळीवरील पाणीटंचाई दूर करण्यासाठी स्थानिक गरजांनुसार मदत उपलब्ध करून देण्यावर जिल्हा प्रशासनाचा भर राहणार आहे. संबंधित भागातील पाणीटंचाईची तीव्रता, प्रत्यक्ष गरज आणि प्रशासकीय समन्वय लक्षात घेऊन मदतीचे स्वरूप निश्चित करण्यात येईल. या माध्यमातून पाणीटंचाई निवारणाच्या कामांना बळ मिळण्यासह दुष्काळाच्या संभाव्य परिणामांची तीव्रता कमी करण्यास मदत होणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सामाजिक कार्य करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्या, स्वयंसेवी संस्था, फाउंडेशन आणि देणगीदारांना जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे. संबंधित कामांसाठी आवश्यक परवानग्या मिळविणे, विविध शासकीय विभागांशी समन्वय साधणे, गावनिहाय गरजांची माहिती उपलब्ध करून देणे आणि टंचाईग्रस्त भागांतील आवश्यक तपशील पुरविणे यासाठी जिल्हास्तरावरून मदत केली जाणार आहे.

इच्छुक संस्था व कंपन्यांनी आपण कोणत्या स्वरूपात मदत करू इच्छिता, प्रस्तावित मदतीचे तपशील, अंदाजित निधी किंवा साहित्याचे प्रमाण, मदतीचे कार्यक्षेत्र आणि संपर्क व्यक्तीची माहिती जिल्हा प्रशासनाकडे सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मदतीसाठी संपर्क** - ७९७२८८९९८३, ई-मेल : csr.support.ahilyanagargmail.com **जिल्ह्यातील नागरिकांची पाणीटंचाई दूर करण्यासाठी तसेच दुष्काळाच्या संभाव्य परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी सीएसआर कंपन्या, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, फाउंडेशन, देणगीदार आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नांना सहकार्य करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.**

# गोरगरिबांची दिवाळी गोड करा, ग्राहक पंचायतीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- दुष्काळ परीस्थितीत अकोले आदिवासी तालुक्यातील शिधापत्रिका धारकांना, गहू, तांदुळ, साखर, तेल, तुरडाळ, हरभरा डाळ, रवा, मैदा या वस्तु दिवाळीपूर्वी पुरवाव्यात व गोरगरीबांची, वंचितघटकांची दिवाळी गोड करण्या बाबतचे निवेदन अकोले महसूल नायब तहसिलदार प्रमोद सावंत यांना देण्यात आल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, अध्यक्ष दत्ता शेनकर, सचिव राम रूद्रे यांनी दिली. निवेदनात म्हटले आहे की दुष्काळ परिस्थिती आल्यामुळे सरकारचा आधार असल्याची भावना सर्वसामान्य कुटुंबांना व मोल मजूर, कारागीर, फेरीवाले, शेतकरी, वंचित घटकांना सर्व सामान्यांमध्ये आहे. सरकारच्या माध्यमातून आताच भरीव असे नियोजन होणे गरजेचे आहे.

दुष्काळ परिस्थितीत गोरगरीब शेतकरी, कामगार मजूरांना जगने मुश्कील झाले. सध्याची वाढती महागाई मुळे सर्वसामान्य वर्ग मेटाकुटीस आला आहे. त्यांना दैनंदिन दररोजचे जीवन जगणे देखिल अवघड झाले आहे. त्यामुळे सरकारने या गरीब घटकाला गावोगाव स्वस्त रेशन दुकानातून मुलभूत व अत्यावश्यक वस्तु रेशन कार्ड धारकांना दिवाळी पूर्वी पुरवाव्यात. आदिवासी अकोले तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना रेशन कार्ड धारकांना जिवनावश्यक वस्तु गहु, तांदुळ, साखर, तेल, तुरडाळ, हरभराडाळ, रवा, मैदा, इत्यादी, वस्तु, दिवाळीपूर्वी पुरवाव्यात, व गोरगरीबांची वंचितांची दिवाळी गोड, करण्यासाठी जीवनावश्यक वस्तु तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायतचे मच्छिंद्र मंडलीक, दत्ता शेनकर, महेशराव नवले, माधवराव तिटमे, राम रूद्रे, ज्ञानेश्वर पुंडे, पांडुरंग पथवे, रामदास पांडे, भाऊसाहेब आभाळे, विठ्ठल नवले, अनंत घाणे, सुरेश गभाले, जालिंदर बोडके, रामहारी तिकांडे भाऊसाहेब गोर्डे, भाऊसाहेब वाकचौरे, यासह आदिंचे नावे आहे.निवेदनाच्या प्रती, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनराव भुजबळ, जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना पाठविण्यात आल्या आहे.

पान १ वरून

# शेतकरी व कामगार...

योजनेप्रमाणे आर्थिक लाभ देण्याबाबत सरकार सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन देण्यात आले.

**संघर्ष सुरूच राहणार**

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याचा आग्रह किसान सभेने धरला होता. तो पूर्ण झाल्याने आणि विविध मागण्यांवर ठोस आश्वासने मिळाल्याने रात्री उशिरा वाहन लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्यासाठी आणि उर्वरित मागण्यांसाठी किसान सभा संघर्ष व पाठपुरावा सुरू ठेवणार आहे. बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, तसेच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, दत्तात्रय भरणे आणि अन्य मंत्री उपस्थित होते. विविध खात्यांचे सचिव व पोलीस अधिकारीही बैठकीला उपस्थित होते. किसान सभेच्या शिष्टमंडळात डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावित, आमदार विनोद निकोले, डॉ. अजित नवले, यशवंत झाडे, उमेश देशमुख, सदाशिव साबळे, किरण गहला, इंद्रजीत गावित, इरफान शेख, डॉ. अमोल वाघमारे, अर्जुन आडे, शंकर सिडाम, अजय बुरांडे, रडका कलांगडा, उद्धव पौळ, चंदू धांगडा, नामदेव भांगरे, प्राची हातिवलेकर, लहानी दौडा, श्यामसिंग पाडवी, नंदू डहाळे, रविता पाडवी, अशोक पांडे, संगीता साळवे, हेमलता शेळके, सचिन ताजणे, संतोष मुंडे आणि एकनाथ मेंगाळ यांचा समावेश होता.

# निसर्गरम्य कुमशेतमध्ये वनराई बंधाऱ्याची उभारणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या दुर्गम आदिवासी कुमशेत गावात ग्रामपंचायतीच्या सहकार्याने ग्रामस्थांनी श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची उभारणी केली. पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविणे, जलसंवर्धनाला चालना देणे आणि पशुपक्ष्यांना पाण्याचा आधार उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.



निसर्गसौंदर्य, उंच डोंगररांगा, धबधबे आणि समृद्ध जैवविविधतेसाठी कुमशेत गाव प्रसिद्ध आहे. दुर्गम डोंगराळ भागात पाण्याचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने ग्रामस्थांनी एकत्र येत हा उपक्रम राबविला. पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्यास मदत होण्याबरोबरच परिसरातील पशुपक्ष्यांनाही याचा लाभ होण्याची अपेक्षा आहे.

या उपक्रमासाठी अकोले पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने तसेच प्रशासक सुपे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे. गावचे सरपंच सयाजी आसवले, ग्रामविकास अधिकारी रवींद्र सोनवणे, बाळू बारामते, मच्छिंद्र आसवले, रंगनाथ भाऊ, मंदाताई आसवले, पुष्पा आसवले, चंद्रकला आसवले, कलाबाई आसवले, पिनाबाई धिंडले, सुनील कवटे यांच्यासह इतर ग्रामस्थांनी श्रमदानातून या उपक्रमाला हातभार लावला.


**फ्लॅट विकणे आहे!**

फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040



**Dr. R. S. Gunjal Welfare Foundation**

**R. S. Gunjal College of B. Sc. Nursing**

Gunjalwadi Pathar, Chandanapuri Ghat, Sangamner, Dist.-Ahilyanagar -422620.
Email- dr.rsgunjalbscnursing@gmail.com, Website :www.drrsgibscnursing.org
Mobile no. – 9209873430 , 8468816440.

ADMISSION FOR VACANT SEATS

Academic Year- 2026-2027( **College Code – 9420)**

(CET Cell Notice No.: MED-1026/C.R.No:07/New Registration/CAP 3 & Inst. Level Round/2484,dated-17/10/2026)

Applications are invited from eligible candidates for the admissions for vacant seats after CAP round for B.Sc. Nursing for academic year 2026-27. The eligible & desirous candidates must apply in person/any person to the college from 28/10/2026 to 29/10/2026 upto 05.30pm.

The details of institute level admission schedule & seat matrix is available on State CET Cell website. Cut off date of admission is 31st Oct.2026.

Principal



**पाहिजेत**

सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747



**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. संजय ओंकारनाथ मालपाणी रा. मालपाणी हाऊस संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -- सि. स. नं. -- स.नं. १३५/१६४/२ या ठिकाणी मध्ये मालपाणी हॉस्पिटल चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २७/१०/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर



**पाहिजेत**

ऑफिसबॉय ( शिपाई )
02 जागा (पुरुष )
शैक्षणिक पात्रता - 10/12 वी पास
वय मर्यादा - 20 ते 40 वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दिनांक 26/10/2026 पर्यंत जमा करावे
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अशोक चौक, संगमनेर
फोन नं. 02425-220777
9623017997
Email- mahesh.patsanstha@gmail.com



**कामगार भरती**

अकाउंटंट - 0१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- 0५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- 0१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962



**पाहिजेत**

मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक

आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

| १.क्रं | गाडीचा प्रकार |
|---|---|
| १ | छोटा हत्ती |
| २ | टाटा झिप |
| ३ | महिंद्रा जीतो |
| ४ | मारुति सुजुकी सुपर कॅरि |

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७








**भाड्याने देणे आहे**

टॉप टेन इम्पेरिअल ( रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909



**पाहिजेत**

मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

## अभिषेकची शतकी खेळी

# टीम इंडियाचा विजयाचा षटकार

मुंबई (वृत्तसंस्था)

तिसऱ्या टी२० सामन्यात भारताने न्यूझीलंडचा सहा गडी राखून पराभव केला. भारताने १९९ धावांचे लक्ष्य १३.२ षटकांत पूर्ण केले. अभिषेक शर्माच्या वादळी खेळीने किवी संघाला गारद केले. अभिषेकने ३८ चेंडूंमध्ये ११३ धावांची खेळी केली. वैभव सूर्यवंशीने १९ चेंडूंमध्ये ४५ धावांची खेळी केली. तत्पूर्वी, डॅरिल मिचेलच्या नाबाद ८९ धावांच्या जोरावर न्यूझीलंडने १९८ धावा केल्या होत्या. मिचेल व्यतिरिक्त, फिन लनने ४० धावा केल्या होत्या. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या टी२० मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. दोन्ही संघांमधील चौथा टी२० सामना ३० ऑक्टोबर रोजी ऑकलंडमध्ये खेळला जाईलभारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने २० षटकांत तीन गडी गमावून १९८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताने १३.२ षटकांत चार गडी गमावून लक्ष्य पूर्ण केले.

अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांच्या स्फोटक फलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने मंगळवारी तिसऱ्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडला ६ गडी राखून पराभूत केले. भारताने अवघ्या १३.२ षटकांत ४ गडी गमावून १९९ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. यासह, भारतीय संघाने दोन सामने शिल्लक असतानाच पाच सामन्यांची मालिका जिंकली.

# गुप्तधनाच्या हव्यासापोटी शेतात जादूटोणा, सात जणांना पकडले

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- अकोले तालुक्यातील शेंडी येथे गुप्तधन मिळविण्याच्या आशेने शेतात अंधश्रद्धा आणि जादूटोण्याचे कृत्य सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शेतात अगरबत्ती, कापूर, लिंबू आणि उडीद ठेवून पूजा करणाऱ्या सात जणांना ग्रामस्थांनी पकडून राजूर पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शेंडी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथील शेतकरी एकनाथ दगडू भांगरे (वय ५७) हे २७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास आपल्या शेतातील भातपिकाला पाणी देत होते. यावेळी त्यांना शेतात अचानक उजेड दिसला. संशय आल्याने त्यांनी तातडीने शेजारील सुदाम मारुती ईदे आणि सुरेश भाऊराव भांगरे यांना फोन करून घटनास्थळी बोलावून घेतले.

तिघांनी शेतात जाऊन पाहणी केली असता, तेथे सात ते आठ जण अगरबत्ती, कापूर, लिंबू आणि उडीद यांसारखे साहित्य ठेवून पूजा करताना आढळले. गुप्तधन मिळविण्यासाठी खड्डा खोदण्याची तयारी सुरू असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आले. संशयितांमध्ये गुप्तधन काढून ते आपसात वाटून घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



शेतात सुरू असलेला हा प्रकार लक्षात येताच ग्रामस्थांनी तातडीने धाव घेतली. ग्रामस्थांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयितांचा पाठलाग करण्यात आला. यावेळी सात जणांना पकडण्यात ग्रामस्थांना यश आले. घटनास्थळी एक स्विफ्ट कार (क्र. एमएच ३१ डीव्ही ९६२८) आणि एक स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच १७ बीपी ९५१०) आढळून आली.

त्यानंतर ग्रामस्थांनी पकडलेल्या सातही जणांना शेंडी गावठाणातील मारुती मंदिरात आणले. डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर संशयितांना राजूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांची नावे पुढीलप्रमाणे - १. योगेश गणेश वानखेडे (रा. दोनवाडा, ता. जि. अकोला) २. त्रिंबक रावजी वानखेडे (रा. भोरगाव, ता. जि. अकोला) ३. अनंता कृष्णराव हिंगोले (रा. मोठी उंब्री, ता. जि. अकोला) ४. गणेश रामहरी घोरपडे (रा. मोठी उंब्री, ता. जि. अकोला) ५. रूपेश गणेश वानखेडे (रा. अकोला) ६. ज्ञानेश्वर नामदेव लेंडे (रा. पाभुळवंडी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) ७. संजय लक्ष्मण खाडे (रा. बारी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) संशयितांकडून पूजेसाठी वापरण्यात येणारे कापूर, अगरबत्ती, लिंबू आणि उडीद यांसारखे साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती आहे.

शेतकरी एकनाथ दगडू भांगरे यांच्या फिर्यादीवरून राजूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत या प्रकरणाचा तपास सुरू आहे. अकोलेचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी आणि राजूर पोलीस ठाण्याचे किशोर पवार पुढील तपास करीत आहेत.

गुप्तधन मिळविण्याच्या हव्यासातून शेतात अशा प्रकारचे कृत्य सुरू असल्याचे समोर आल्याने परिसरात चर्चेला उधाण आले. अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन अशा प्रकारांना बळी पडू नये, तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास कायदा हातात न घेता तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन या घटनेच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत साहित्य वाटप व तपासणी शिबिर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- दिव्यांग बांधवांना स्वावलंबी जीवन जगता यावे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या सामाजिक बांधिलकीतून दिव्यांग सारथी संघटना, संगमनेर यांच्या वतीने शिर्डी लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी भव्य मोफत साहित्य वाटप व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे हे शिबिर होणार आहे.

या शिबिराच्या माध्यमातून गरजू दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करून त्यांना आवश्यक सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन लाभार्थ्यांना अधिक आत्मविश्वासाने व स्वावलंबीपणे जीवन जगण्यास मदत होणार आहे.

दिव्यांग बांधवांसाठी कुबड्या, वॉकर, साधी काठी, अंधकाठी, ट्रायसायकल, व्हीलचेअर, श्रवणयंत्र, इलेक्ट्रॉनिक सायकल तसेच इतर आवश्यक सहाय्यभूत साहित्य मिळविण्यासाठी तपासणी करण्यात येणार आहे. संबंधित गरजेनुसार आवश्यक साधनांची निवड करण्याच्या प्रक्रियेला या शिबिरातून मदत होणार आहे.

त्याचप्रमाणे ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मानेचा पट्टा, कमरेचा पट्टा, पाठीचा पट्टा, वॉकर, काठी, टॉयलेट खुर्ची, व्हीलचेअर आदी उपयुक्त साधनांसंदर्भात तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच रेल्वे पास आणि इतर उपलब्ध सुविधांबाबतही ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

दिव्यांग व्यक्तींना केवळ मदत देणे नव्हे, तर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने सहभागी होता यावे, हा अशा उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश आहे. वाढत्या वयामुळे हालचालींमध्ये अडचणी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांनाही आवश्यक साधने आणि सुविधांची माहिती मिळाल्यास त्यांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते.

शिर्डी लोकसभा मतदारसंघातील पात्र दिव्यांग बांधव आणि ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन दिव्यांग सारथी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# दुष्काळ निवारणासाठी साईबाबा संस्थांकडून ५ कोटींचे योगदान; मुख्यमंत्र्यांकडे धनादेश सुपूर्द

शिर्डी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत आली आहे. त्याच भावनेतून संस्थानच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५ कोटी रुपयांचे मोठे आर्थिक योगदान देण्यात आले आहे.

या रकमेचा धनादेश मुंबई येथे श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे औपचारिकरित्या सुपूर्द केला. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ना. गिरीश महाजन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेतकरी, जनावरे आणि ग्रामीण भागातील जनतेला याचा मोठा फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडून दुष्काळ निवारणासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत जसे टँकरने पाणीपुरवठा, चारा छावण्या, रोजगार हमीची कामे. या कार्याला हातभार लावण्यासाठी साई संस्थानने हे ५ कोटी रुपयांचे योगदान दिले आहे.



श्री साईबाबा संस्थान हे केवळ मंदिर व्यवस्थापनापुरते मर्यादित न राहता, शिक्षण, आरोग्य, आपत्ती निवारण आणि सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. यापूर्वीही कोविड काळात, महापुरात आणि विविध नैसर्गिक आपत्तींमध्ये संस्थानने कोट्यवधी रुपयांची मदत केली आहे.

भाविकांच्या देणगीतून जमा होणाऱ्या पैशाचा विनियोग अशा लोककल्याणकारी कामांसाठी होत असल्याने भाविकांमधूनही संस्थानच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत व कौतुक होत आहे. हे योगदान म्हणजे श्रद्धा आणि सबुरी सोबतच सेवाभाव या साई तत्त्वाचीच प्रचिती असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### दिनविशेष

२०१५: — चीन देशातील एक-मूल धोरण ३५ वर्षांनंतर बंद करण्यात आले.

२००८: — डेल्टा एअरलाईन्सचे नॉर्थवेस्ट एअरलाईन्समधे विलीनीकरण होऊन नॉर्थवेस्ट एअरलाईन्स ही जगातील सर्वात मोठी विमान वाहतुक कंपनी बनली.

२००५: — दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटात दिल्लीमध्ये ६० पेक्षा जास्त व्यक्ती ठार.

१९९९: — चक्रीवादळाच्या तडाख्याने ओरिसात अतोनात नुकसान.

१९९७: — अभिनेते दिलीपकुमार यांना प्रतिष्ठेचा एन. टी. रामाराव राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर.

१९९७: — अभिनेते दिलीपकुमार यांना प्रतिष्ठेचा एन. टी. रामाराव राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर.

### जन्म

१९८५: विजेंदर सिंग — भारतीय बॉक्सर — पद्मश्री, मेजर ध्यान चंद खेलरत्न

१९८५: कॅल क्रचलो — इंग्लिश मोटरसायकल रेसर

१९७१: मॅथ्यू हेडन — ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

१९३४: माणिकराव होडल्या गावित — भारतीय राजकारणी, खासदार (निधन: १७ सप्टेंबर २०२२ )

१९३२: वेल्मा बारफिल्ड — १६६२ नंतर अमेरिकेत फाशीची शिक्षा मिळणाऱ्या पहिल्या महिला (निधन: २ नोव्हेंबर १९८४ )

१९३१: प्रभाकर तामणे — साहित्यिक व पटकथालेखक (निधन: ७ मार्च २००० )

१९३१: वाली — भारतीय कवी, गीतकार, आणि अभिनेते (निधन: १८ जुलै २०१३ )

१८९७: जोसेफ गोबेल्स — जर्मनीचे चॅन्सेलर व नाझी नेते (निधन: १ मे १९४५ )

१८८९: ली डझाओ — चिनी कम्युनिस्ट पक्षाचे सह-संस्थापक (निधन: २८ एप्रिल १९२७ )

१२७०: संत नामदेव — भारतीय संत (निधन: ३ जुलै १३५० )

### मृत्यू

२०२०: केशुभाई पटेल — गुजरातचे १०वे मुख्यमंत्री (जन्म: २४ जुलै १९२८ )

१९८८: कमलादेवी चट्टोपाध्याय — भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक कार्यकर्त्या — रॅमन मॅगसेसे पुरस्कार (जन्म: ३ एप्रिल १९०३ )

१९८१: दादा साळवी — अभिनेते

१९७८: वसंत रामजी खानोलकर — भारतातील वैद्यकीय संशोधनाचा पाया घालणारे — पद्म भूषण, पद्मश्री (जन्म: १३ एप्रिल १८९५ )

१९७१: अर्ने टिसेलियस — स्वीडिश बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: १० ऑगस्ट १९०२ )

१९५७: लुईस बी. मेयर — एकेडेमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सचे स्थापक (जन्म: ४ जुलै १८८२ )

१९३३: पॉल पेनलीव्ह — फ्रान्सचे पंतप्रधान आणि गणितज्ञ (जन्म: ५ डिसेंबर १८६३ )

१९११: जोसेफ पुलित्झर — हंगेरीयन-अमेरिकन राजकीय नेते आणि प्रकाशक (जन्म: १० एप्रिल

१८०४: सारा क्रॉसबी — इंग्रजी उपदेशक, पहिल्या महिला मेथोडिस्ट उपदेशक (जन्म: ६ ऑक्टोबर १७२९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२८ ऑक्टोबर**

## १८९४: — महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची स्थापना.

१८९४ हे वर्ष महाराष्ट्राच्या साहित्यिक इतिहासात महत्त्वाचे मानले जाते. या वर्षी पुणे येथे महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची स्थापना झाली. मराठी भाषा, साहित्य आणि ग्रंथसंपदेचा विकास करणे, मराठी ग्रंथनिर्मितीला प्रोत्साहन देणे आणि समाजामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, हे या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होते.एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत अनेक बदल घडत होते. शिक्षणाचा प्रसार होत होता आणि मराठी भाषेतून विविध विषयांचे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज निर्माण झाली होती. इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, धर्म, संस्कृती आणि साहित्य अशा विविध विषयांवरील पुस्तके मराठीत उपलब्ध व्हावीत, यासाठी प्रयत्न सुरू होते. या पार्श्वभूमीवर ग्रंथनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थेची आवश्यकता होती.महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची स्थापना २९ ऑक्टोबर १८९४ रोजी पुणे येथे झाली. या संस्थेच्या स्थापनेत न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांसारख्या मान्यवरांचा सहभाग होता. संस्थेचे सुरुवातीचे नाव 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी' असे होते. मराठी भाषेतील साहित्यनिर्मिती वाढवणे आणि इतर भाषांतील उपयुक्त ग्रंथांचे मराठीत भाषांतर करणे, यावर संस्थेने भर दिला.मराठी भाषेत दर्जेदार पुस्तके लिहिणाऱ्या लेखकांना प्रोत्साहन देणे, प्रकाशित ग्रंथांचे परीक्षण करणे आणि उत्कृष्ट पुस्तकांना पुरस्कार मिळवून देणे, हे संस्थेच्या कार्यातील महत्त्वाचे भाग होते. १८९५ मध्ये दक्षिणा प्राईझ कमिटीचे काम संस्थेकडे आले. त्यानंतर मराठी ग्रंथांचे परीक्षण करून गुणवत्तापूर्ण पुस्तकांना पुरस्कार देण्याच्या कार्याला चालना मिळाली. यामुळे लेखकांना लेखनासाठी प्रोत्साहन मिळाले आणि मराठी साहित्याची गुणवत्ता वाढवण्यास मदत झाली.या संस्थेच्या कार्यामुळे मराठी भाषेतील ज्ञानसंपदा वाढवण्यास हातभार लागला. विविध विषयांवरील ग्रंथनिर्मितीला प्रोत्साहन मिळाले. तसेच मराठी भाषेतून ज्ञानाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले. ग्रंथांचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवणे आणि साहित्यिक परंपरेचे जतन करणे, या दृष्टीनेही संस्थेचे कार्य महत्त्वाचे ठरले.१९४८ मध्ये संस्थेचे नाव बदलून 'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था' असे करण्यात आले. मराठी ग्रंथांचे संवर्धन, साहित्याचा प्रसार आणि लेखकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संस्थेचे कार्य पुढे सुरू राहिले.एकंदरीत, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची स्थापना ही मराठी साहित्याच्या विकासातील महत्त्वाची घटना होती. मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथनिर्मिती व्हावी, लेखकांना प्रोत्साहन मिळावे आणि वाचनसंस्कृतीचा प्रसार व्हावा, यासाठी संस्थेने योगदान दिले. मराठी भाषेचा

# १२७० : संत नामदेव महाराज — भारतीय संत

**जन्मदिन विशेष**

संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील प्रमुख संत, थोर भक्त आणि श्रेष्ठ मराठी कवी होते. त्यांनी आपल्या अभंगांमधून भक्ती, समानता, मानवता आणि सदाचाराचा संदेश समाजाला दिला. महाराष्ट्राच्या भक्तिपरंपरेत संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्याप्रमाणेच संत नामदेव महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म इ.स. १२७० च्या सुमारास झाल्याचे मानले जाते.संत नामदेव महाराजांचा जन्म नरसी-बामणी येथे झाला, असे मानले जाते. त्यांचे वडील दामाशेटी आणि आई गोणाई होते. लहानपणापासूनच त्यांची विठ्ठलावर अपार श्रद्धा होती. पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता. विठ्ठलाच्या नामस्मरणात आणि भक्तीत त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले.संत नामदेव महाराजांनी समाजाला ईश्वरभक्तीचा सोपा मार्ग दाखवला. त्यांच्या मते, देवाची प्राप्ती करण्यासाठी केवळ



कर्मकांड किंवा बाह्य आडंबर आवश्यक नाही, तर मनातील निर्मळ भाव, श्रद्धा आणि नामस्मरण महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या अभंगांमधून विठ्ठलावरील प्रेम व्यक्त केले. त्यांची रचना साधी, सरळ आणि सर्वसामान्यांना समजणारी होती. त्यामुळे त्यांचे अभंग सामान्य जनतेमध्ये लोकप्रिय झाले.त्या काळात समाजामध्ये जातिभेद, उच्च-नीचतेची भावना आणि अनेक सामाजिक विषमता अस्तित्वात होत्या. संत नामदेव महाराजांनी आपल्या शिकवणुकीतून सर्व माणसे समान असल्याचा विचार मांडला. भक्तीच्या मार्गावर कोणताही भेदभाव नसावा, प्रत्येक व्यक्तीला ईश्वरभक्तीचा अधिकार आहे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या विचारांमुळे समाजामध्ये समतेची आणि बंधुभावाची भावना वाढण्यास मदत झाली.संत नामदेव महाराजांचे कार्य महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी उत्तर भारतातही प्रवास करून भक्तीचा संदेश प्रसारित केला, अशी परंपरा सांगते. त्यांच्या हिंदी आणि इतर उत्तर भारतीय भाषांतील रचनांचाही उल्लेख आढळतो. शीख धर्माच्या पवित्र गुरुग्रंथ साहिब या ग्रंथात संत नामदेव महाराजांच्या रचनांचा समावेश आहे. यावरून त्यांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्राबाहेरही पोहोचल्याचे दिसून येते.संत नामदेव महाराजांनी अभंगांच्या माध्यमातून लोकांना सत्य, प्रेम, दया, परोपकार आणि सदाचार यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी भक्तीला केवळ वैयक्तिक साधना न मानता समाजप्रबोधनाचे माध्यम बनवले. त्यांच्या रचनांमधून सामान्य माणसाच्या जीवनातील दुःख, आशा, श्रद्धा आणि ईश्वराशी असलेले नाते व्यक्त होते.संत नामदेव महाराजांचे निधन इ.स. १३५० च्या सुमारास झाल्याचे मानले जाते. त्यांच्या जन्मतारखेबाबत आणि जीवनातील काही घटनांबाबत विविध परंपरांमध्ये मतभेद आढळतात. मात्र, त्यांच्या भक्तीकार्याचे आणि साहित्याचे महत्त्व निर्विवाद आहे.संत नामदेव महाराजांचे जीवन म्हणजे भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणारा आदर्श आहे. त्यांच्या अभंगांनी मराठी साहित्य समृद्ध केले आणि वारकरी संप्रदायाच्या भक्तिपरंपरेला व्यापक स्वरूप दिले. आजही त्यांचे विचार समाजाला प्रेरणा देतात.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# दिवाळीत छोट्या व्यावसायिकांना दुकाने थाटण्यासाठी जागा द्या

## नगराध्यक्षांना शिवसेनेचे निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील फुलविक्रेते, रांगोळी, पणत्या, दिवे, आकाशकंदील आणि झाडू विक्रेत्यांसह छोट्या व्यावसायिकांना व्यवसायासाठी हक्काची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख अमर कतारी यांनी केली आहे. यासंदर्भात नगराध्यक्ष मैथिली तांबे यांना निवेदन देण्यात आले असून, १ ते १२ नोव्हेंबरदरम्यान तात्पुरती दुकाने लावण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दिवाळी हा सण आनंदाचा असला, तरी छोट्या व्यावसायिकांसाठी तो वर्षभराच्या आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. या सणाच्या काळात मिळणाऱ्या उत्पन्नावर अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. त्यामुळे या व्यावसायिकांना व्यवसायाची संधी नाकारण्याऐवजी त्यांच्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देत नगरपरिषदेने सहकार्याची भूमिका घ्यावी, अशी भूमिका शिवसेनेने निवेदनातून मांडली आहे. शहरात दिवाळीच्या काळात खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे तात्पुरत्या दुकानांसाठी जागा निश्चित करताना वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, पादचाऱ्यांची गैरसोय होणार नाही आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी. नियोजनबद्ध पद्धतीने जागा उपलब्ध करून दिल्यास छोट्या व्यावसायिकांना रोजगाराची संधी मिळेल आणि नागरिकांनाही दिवाळीची खरेदी करणे सोयीचे होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या वेळी अमर कतारी यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांनाही महत्त्वाचे आवाहन केले. दोन-तीन हजार रुपयांच्या आमिषापोटी आपले बहुमोल मत विकू नका; आपला स्वाभिमान जपा, असे ते म्हणाले. मतदान हा केवळ निवडणुकीतील औपचारिक अधिकार नसून, आपल्या शहराचे भविष्य आणि विकासाची दिशा ठरवणारी लोकशाहीची ताकद आहे. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख अमर कतारी, शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, उपजिल्हाप्रमुख इम्तियाज शेख, विधानसभा शहरप्रमुख बाळासाहेब घोडके, आसिफ भाई तांबोळी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजय भाऊ सातपुते यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# टोरेंट प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

## जनमताचा रेटा निर्माण झाल्यानंतरच संघर्षाच्या घोषणा



युवावार्ता (प्रतिनिधी)

कर्जत - कर्जत परिसरातील टोरेंट प्रकल्पाबाबत २०२४ पासून शासकीय प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जात असताना, या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान परिसरातील लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार आणि राजकीय कार्यकर्त्यांची भूमिका नेमकी काय होती, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एखाद्या प्रकल्पासंदर्भातील शासकीय पत्रव्यवहार नियमानुसार सुरू असताना त्याची माहिती संबंधित लोकप्रतिनिधींना असण्याची शक्यता असतानाही, वेळीच ठोस भूमिका मांडली गेली नसेल तर ही बाब लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

कोणताही प्रकल्प हा केवळ प्रशासकीय प्रक्रियेपुरता मर्यादित नसतो. त्याचा परिसरातील पर्यावरण, नैसर्गिक साधनसंपत्ती, स्थानिक नागरिकांचे जीवनमान आणि भविष्यातील विकासावर काय परिणाम होणार आहे, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक असते. विशेषतः निसर्ग आणि समाजहिताशी संबंधित विषयांमध्ये लोकप्रतिनिधींनी शासकीय प्रक्रिया सुरू असतानाच माहिती घेऊन जनतेच्या शंकांचे निरसन करणे, संभाव्य परिणामांचा अभ्यास करणे आणि आवश्यक असल्यास शासनदरबारी आपली भूमिका मांडणे अपेक्षित असते.

मात्र, सत्ताधारी पक्षातील प्रतिनिधी असोत किंवा विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी, तसेच पर्यावरण आणि सामाजिक प्रश्नांबाबत बांधिलकी व्यक्त करणारे कार्यकर्ते असोत, त्यांनी वेळीच आवाज उठविला का, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. जनतेमध्ये प्रकल्पाबाबत चर्चा सुरू झाल्यानंतर आणि विरोधाची भावना तीव्र झाल्यानंतरच लोकप्रतिनिधी सक्रिय होत असतील, तर त्यांच्या भूमिकेचे आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे.

जनमताचा रेटा निर्माण झाल्यानंतर संघर्षाच्या घोषणा देणे तुलनेने सोपे असते; परंतु शासकीय प्रक्रियेच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच जनहिताची भूमिका मांडणे, संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करणे आणि शासनाकडे आवश्यक पाठपुरावा करणे, ही खरी लोकप्रतिनिधित्वाची कसोटी आहे. जनतेच्या प्रश्नांवर वेळीच भूमिका न घेता परिस्थिती चिघळल्यानंतर आंदोलनात सहभागी होण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी पोषक ठरणार नाही.

तोरण प्रकल्पाच्या संदर्भात नेमका कोणता शासकीय पत्रव्यवहार झाला, कोणत्या विभागांनी कोणते निर्णय घेतले, पर्यावरणविषयक बाबींचा कितपत विचार झाला आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी कोणत्या टप्प्यावर कोणती भूमिका घेतली, याची वस्तुनिष्ठ माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. निसर्गाचे संरक्षण, समाजहित आणि शाश्वत विकास यांचा समतोल राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकल्पाला आंधळा विरोध किंवा समर्थन करण्याऐवजी वस्तुस्थिती, कायदेशीर प्रक्रिया आणि संभाव्य परिणाम यांच्या आधारे निर्णय व्हायला हवेत. जनतेला केवळ संघर्षाच्या घोषणा नकोत, तर वेळेवर कृती, पारदर्शकता आणि जबाबदार लोकप्रतिनिधित्व अपेक्षित आहे. तोरण प्रकल्पाच्या निमित्ताने हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# सुकेवाडीच्या बिरोबा देवस्थानात सभामंडप उभारणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील सुकेवाडी येथील धनगर समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या बिरोबा महाराज व मोठेबाबा देवस्थानच्या यात्रोत्सवानिमित्त आमदार अमोल खताळ यांनी देवस्थानाला भेट देऊन बिरोबा महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी देवस्थान परिसरात सभामंडप उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. ही मागणी पूर्ण करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करून पुढील वर्षी नव्याने उभारलेल्या सभागृहात यात्रोत्सव साजरा होईल, असा विश्वास आमदार खताळ यांनी व्यक्त केला.

सुकेवाडी येथील बिरोबा महाराज व मोठेबाबा महाराज यांच्या यात्रोत्सवानिमित्त आ. खताळ यांनी देवस्थानाला भेट दिली. यावेळी सुकेवाडीचे माजी सरपंच तथा शिवसेनेचे नेते रेवनाथ शिंदे, भारत शिंदे, भागवत शिंदे, केशव जाधव, गोरक्षनाथ सातपुते, उपसरपंच सुभाष कुटे, विलास महाराज कुटे, श्याम राहणे, निलेश गुंजाळ, संकेत खुळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. खताळ म्हणाले की, सुकेवाडी येथील बिरोबा महाराज व मोठेबाबा देवस्थान हे धनगर समाजाचे जागृत देवस्थान असून यापूर्वीही आपण बिरोबा महाराजांच्या दर्शनासाठी सातत्याने येत होतो. आता तालुक्याचा आमदार म्हणून या ठिकाणी आलो आहे. ग्रामस्थांनी केलेली सभामंडप उभारणीची मागणी पूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे. यासाठी सकारात्मक प्रयत्न करून पुढील वर्षी नव्याने उभारलेल्या सभागृहात यात्रोत्सव साजरा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# संगमनेरमध्ये रविवारी राजू शेट्टी यांचे 'शेती आणि शेतकरी' विषयावर व्याख्यान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेतीसमोरील वाढती आव्हाने, शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीमालाला मिळणारा भाव आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सुरू असलेला संघर्ष या विषयांवर विचारमंथन करण्यासाठी सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कॉ. दत्ता देशमुख स्मृतिदिनानिमित्त आयोजित या व्याख्यानमालेतील बारावे पुष्प रविवारी (दि. १ नोव्हेंबर) गुंफले जाणार असून, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी हे 'शेती आणि शेतकरी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

शेती क्षेत्रातील बदलते वास्तव, शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात होणारी वाढ, शेतीमालाच्या बाजारभावातील चढ-उतार, शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न आणि कृषी धोरणांचा शेतीवर होणारा परिणाम या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणारे आणि शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून राज्याच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे राजू शेट्टी यांच्या विचारांकडे शेतकरी, युवक आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

कॉ. दत्ता देशमुख यांच्या स्मृती जपत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांवर वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शेती आणि शेतकरी या जिव्हाळ्याच्या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानातून शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीवर प्रकाश पडण्यासह शेतीच्या भवितव्याबाबतही महत्त्वपूर्ण विचार मांडले जाण्याची अपेक्षा आहे. हे जाहीर व्याख्यान रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता संगमनेर येथील व्यापारी असोसिएशन हॉलमध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील पडतानी कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. या व्याख्यानाला नागरिक, शेतकरी, शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग | डायलिसीस विभाग | हृदयरोग विभाग | जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25